महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअँप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २३६ वा | दिनांक : १६/०७/२०२५ | वार : बुधवार

# सोलापूरमध्ये मराठा संघटनांच्या बैठकीत राडा



**सोलापूर :** सोलापूर येथे मराठा संघटनांच्या बैठकीत तुफान राडा झाला असून, दोन गटात हाणामारी झाल्याची घटना घडली आहे. संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांच्यावर अलीकडेच अक्कलकोट येथे शाईफेक आणि काळे फासल्याच्या घटनेचा निषेध करण्यासाठी मराठी समाजाची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीतच कार्यकर्त्यांमध्ये जुंपल्याने एकच खळबळ उडाली. या गोंधळाचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

सोलापुरात प्रवीण गायकवाड यांच्यावर अक्कलकोट येथे शिवधर्म फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांकडून शाई फेक करत काळे फासण्यात आले होते. या घटनेचा निषेध करण्यासाठी मराठा समाजाच्या विविध घटकांनी बैठक आयोजित केली होती. प्रवीण गायकवाड यांनी सत्काराच्या वेळी हल्ला झाल्यामुळे अक्कलकोटचे जन्मेजय राजे या आयोजकांवरच संशय व्यक्त केला होता. त्यांचे पुत्र अमोल राजे यांच्याविरोधात या बैठकीत एकाने वक्तव्य केले, त्यामुळे राजे समर्थकांनी त्यांना मारहाण केली. या हाणामारीच्या घटनेनंतर बैठकस्थळी एकच खळबळ उडाली. दोन्ही गटाच्या कार्यकर्त्यांनी एकमेकांविरोधात घोषणाबाजी केली.

सोलापुरात सकल मराठा समाजाची सुरळीत बैठक सुरु होती. मात्र पंढरपूरच्या वकिलाने माझ्याबद्दल चुकीचे बोलल्यामुळे गोंधळ उडाला. यामुळे कार्यकर्त्यांच्या भावना दुखावल्या गेल्या. याउलट माझा मुलगा अमोलराजेने दीपक काटे याला सज्जड दम दिलाय. सभेत बोलणारा युवक चुकीच्या माहितीच्या आधारे बोलत होता. माझा मुलगा अमोल याने दीपक काटेला घडलेले कृत्य चुकीचे झाल्याचे त्याला सांगितले. त्यामुळे त्यांचा गैरसमज झाला आहे, असे जन्मेजयराजे भोसले म्हणाले.

दरम्यान, शिवधर्म फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांनी संभाजी ब्रिगेडच्या प्रवीण गायकवाड यांना काळे फासल्याचा घटनेने सोलापुरातील राजकीय वातवरण तापले आहे. प्रवीण गायकवाड यांना काळे फासल्यानंतर महाविकास आघाडीच्या नेत्यांनी आक्रमक भूमिका घेत निषेध नोंदवला आहे. या प्रकरणाचे पडसाद मराठा समाजातही उमटले आहेत. याच पार्श्वभूमीवर आज सोलापूरमध्ये आयोजित केलेल्या बैठकीत राडा झाल्याची घटना घडली आहे.




# शशिकांत शिंदे राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नवे प्रदेशाध्यक्ष



**मुंबई :**राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या प्रदेशाध्यक्षपदी अखेर आमदार शशिकांत शिंदे यांची निवड झाली आहे. पक्षाच्या आज झालेल्या बैठकीत विद्यमान प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. त्यानंतर एकमताने शशिकांत शिंदे यांची त्या पदावर निवड करण्यात आली. या निवडीमुळे जयंत पाटील यांच्या राजीनाम्याविषयी गत ४ दिवसांत निर्माण झालेला संभ्रम संपुष्टात आला आहे. दरम्यान, शरद पवार गटाचे अनेक नेते सध्या सत्ताधारी महायुतीत जात आहेत. शशिकांत शिंदे यांच्यापुढे पक्ष एकसंध ठेवण्याचे मोठे आव्हान आहे.

शशिकांत शिंदे हे पक्षाच्या स्थापनेपासूनच शरद पवार यांचे खंदे सहकारी राहिले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमधील बंडखोरीवेळी त्यांनी पवारांची निष्ठेने साथ दिली. पश्चिम महाराष्ट्रातील प्रभावशाली नेतृत्व म्हणून त्यांची ओळख असून, त्यांना संघटनात्मक कामाचा दांडगा अनुभव आहे. शशिकांत शिंदे यांच्या पुढे संघटना बळकट करण्याचे मोठे आव्हान आहे.

गेल्या काही दिवसांपासून राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या प्रदेशाध्यक्ष पदाच्या बदलाची चर्चा सुरू होती. जयंत पाटील यांनी गेल्या सात वर्षांपासून पक्षाची धुरा सांभाळली. गत १० जून रोजी पक्षाच्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात जयंत पाटील पदमुक्त होण्याची इच्छा व्यक्त केली होती. त्यानंतर त्यांच्या राजीनाम्याची चर्चाही सुरू झाली होती. आज अखेर शशिकांत शिंदे यांची प्रदेशाध्यक्ष म्हणून घोषणा करण्यात आली. आता शशिकांत शिंदे यांच्यावर आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत पक्षाला चांगला विजय मिळवून देण्याची जबाबदारी असणार आहे.

दरम्यान, मी राष्ट्रवादीपासून लांब जाईन असा विचार करू नका, प्रदेशाध्यक्षांना २ वर्षांचा कालावधी असतो. पण, मला पवार साहेबांनी ७ वर्ष संधी दिली. मी पदावरून बाजूला होण्याची हीच योग्य वेळ आहे, असे जयंत पाटील यांनी सांगितले.

शशिकांत शिंदे यांचे मूळ गाव सातारा जिल्ह्यातील जावळी तालुक्यातील हुमगाव आहे. वाणिज्य शाखेचे पदवीधर असलेले शिंदे माथाडी कामगार चळवळीतील प्रभावी नेते म्हणूनही ओळखले जातात. त्यांचा जन्म १९ ऑक्टोबर १९६३ रोजी झाला. वडील जयवंतराव शिंदे आणि आई कौसल्या शिंदे यांच्या सुसंस्कृत आणि प्रेमळ वातावरणात त्यांचे बालपण गेले.

ते १९९९ मध्ये प्रथमच जावळी विधानसभा मतदारसंघातून १२,००० मतांच्या फरकाने निवडून आले. पुढे त्यांनी कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळाचे जलसंपदामंत्री म्हणूनही जबाबदारी सांभाळली. २००९ ते २०१४ या कालावधीत त्यांनी कोरेगाव मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले आणि त्या वेळी शालिनी पाटील यांचा पराभव केला होता.

शशिकांत शिंदे हे दोन पंचवार्षिक जावळी विधानसभा मतदारसंघाचे आमदार राहिले असून त्यानंतर दोन पंचवार्षिक कालावधीसाठी कोरेगावचे आमदारही होते. मात्र, २०१९ च्या विधानसभेच्या निवडणुकीत त्यांचा पराभव शिवसेनेच्या महेश शिंदे यांनी केला.

पराभवानंतरही शशिकांत शिंदे यांनी पक्षाशी निष्ठा कायम ठेवत शरद पवारांच्या गटात सक्रिय काम सुरू ठेवले. पक्षाने त्यांना विधान परिषदेवर पाठवले असून ते शरद पवार गटाचे मुख्य प्रतोद म्हणून कार्यरत आहेत.आता त्यांच्यावर प्रदेशाध्यक्षपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १६ जुलै २०२५


## कर्म.आ.मा.पाटील वरिष्ठ महाविद्यालयात करिअर कट्टा अंतर्गत करियर संसदेची स्थापना व शपथग्रहण समारंभ संपन्न



**पिंपळनेर (प्रा. डॉ. सतीश म्हस्के) :** येथील कर्म. आ.मा. पाटील कला, वाणिज्य व कै.अण्णासाहेब एन.के. पाटील विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असणाऱ्या 'करिअर कट्टा' या उपक्रमांतर्गत महाविद्यालयामध्ये करिअर संसदेची स्थापना करण्यात आली. त्याचबरोबर आज महाविद्यालयामध्ये महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या पत्रान्वये करिअर संसदेच्या पदाधिकाऱ्यांना शपथग्रहण समारंभ आयोजित करून शपथ देण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य व समारंभाचे अध्यक्ष प्रा.डॉ. लहू पवार, करिअर कट्टा समन्वयक प्रा. डॉ. सतीश मस्के व करियर कट्टा सहसमन्वयक प्रा.सी.एन. घरटे आदी उपस्थित होते. कर्म.आ.मा. पाटील वरिष्ठ महाविद्यालयाच्या या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना कार्यक्रमाचे अध्यक्ष व महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. लहू पवार म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी करिअर कट्टा हे अतिशय महत्त्वाचे माध्यम आहे. विद्यार्थ्यांनी या करिअर कट्ट्याशी जुळून राहून आपला व्यक्तिमत्व विकास साधायला हवा. त्यामध्ये विविध मान्यवरांचे विविध व्याख्याने आयोजित केली जातात. त्याचबरोबर करिअर कट्टा समन्वयक प्रा. डॉ. सतीश मस्के म्हणाले की, करिअर कट्टा यामुळे विद्यार्थ्यांच्या जीवनामध्ये अमुलाग्र बदल होण्यास मदत होते. त्यामध्ये विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परीक्षांना कसे सामोरे जावे, उद्योग व्यवसायात कशी भरभराट करावी, स्वत:चा व्यक्तिमत्व विकास कसा करावा याविषयीचे सखोल असे मार्गदर्शन केले जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त यामध्ये सहभागी होऊन फायदा घेणे गरजेचे आहे. या कार्यक्रमात मुख्यमंत्री म्हणून सानिका बिपिनचंद्र भदाणे, माहिती व प्रसारण मंत्री म्हणून आएशा अनिस अहमद, कायदे व शिस्तपालन मंत्री आरती राजेंद्र पवार, महिला व बाल कल्याण मंत्री तेजस्विनी महेश सोनवणे, उद्योजकता विकास मंत्री पल्लवी अरुण सोमवंशी व कौशल्य विकास मंत्री प्रियंका निंबा अहिरे त्याचबरोबर रोशनी पाथरे, रोशनी साबळे, करीना चव्हाण, मुस्तनशीर बोहरी, नकुल वाघ व यशराज शेजुळ आदी विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांना करिअर कट्टा डायरी, नियुक्तीपत्र व बॅच देण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करिअर कट्टा समन्वयक प्रा. डॉ. सतीश मस्के यांनी केले. आभार करिअर कट्टा सहसमन्वयक प्रा.सी.एन. घरटे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मिलिंद कोठावदे, सुनील पवार, कैलास जिरे आदींनी मदत केली.

## श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात 'करिअर संसद' विद्यार्थी पदाधिकाऱ्यांचा शपथविधी संपन्न



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** १५ जुलै २०२५ – जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र आयोजित करीअर कट्टा अंतर्गत विद्यार्थी संसद' पदाधिकारी यांचा शपथविधी सोहळा श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा येथे दिमाखात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. संजय अस्वले होते.करिअर कट्टाच्या माध्यमातून महाविद्यालयातील निवडक विद्यार्थ्यांनी "करिअर संसद सदस्य" म्हणून शपथ घेतली. प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांनी विद्यार्थी संसद पदाधिकाऱ्यांना शपथ दिली. तसेच विद्यार्थ्यांना करिअर निवड, कौशल्य विकास, आणि उद्योजकता याबाबत मोलाचे मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी केवळ नोकरीकडे लक्ष न देता कौशल्य, उद्योजकता आणि नावीन्य यांचा विचार करून आपले भविष्य घडवावे असे मत त्यांनी व्यक्त केले.'करिअर संसद' उपक्रमाचा मुख्य उद्देश म्हणजे विद्यार्थ्यांमध्ये करिअरबाबत जागरूकता निर्माण करणे, योग्य मार्गदर्शन पोहोचवणे आणि नेतृत्वगुणांचा विकास साधणे यासोबतच या उपक्रमातून विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रातील संधींचे भान येते, तसेच त्यांच्यातील आत्मविश्वास वाढतो. यावेळी निवड झालेल्या सदस्यांना प्राचार्य संजय अस्वले यांनी शपथ दिली. यावर्षीच्या करिअर संसदेत कु. अनिशा सुरवसे (मुख्यमंत्री), कटके निरंजन (नियोजन मंत्री), प्रसाद मंमाळे (उद्योजकता विकास मंत्री), कु.प्रियंका इंगळे (महिला व बालकल्याण मंत्री), प्रज्वल चव्हाण (संसदीय कामकाज मंत्री), अश्विनी पाटील (कौशल्य विकास मंत्री), सैफ इनामदार (स्वयंरोजगार मंत्री), पद्मिनी हळनुरे (कायदे व शिस्तपालन मंत्री) अशा अकरा करिअर संसद सदस्यांना यावेळी शपथ देण्यात आली. या शपथविधी कार्यक्रमाला महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. विलास इंगळे, उपप्राचार्य डॉ. पद्माकर पिटले, प्रभारी प्राध्यापक अशोक पदमपल्ले, करिअर कट्टाचे समन्वयक डॉ. चंद्रसेन करे, डॉ. समाधान पसरकल्ले, डॉ. विनोद देवकर, महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुमारी आनिशा सुरवसे यांनी केले तर उपस्थित आमचे आभार प्रज्वल चव्हाण यांनी मानले.

## आता कोणी 'बॅकबेंचर्स' नसेल !
## धोत्रा शाळेत शाळांमध्ये नवा बदल !



**छत्रपती संभाजीनगर :** केरळच्या अनेक शाळांमध्ये आता पारंपरिक बसण्याची पद्धत बदलली आहे. मल्याळम चित्रपट '८' मधून प्रेरणा घेत, विद्यार्थ्यांना वर्गात गोलाकार पद्धतीने बसवण्याची नवीन व्यवस्था लागू करण्यात आली आहे. यामुळे शिक्षक आणि विद्यार्थ्यांमधला संवाद वाढतो, आणि मागच्या बाकांवरील दुर्लक्षित विद्यार्थीही आता चर्चेत सहभागी होतात. ही अभिनव कल्पना शिक्षणातील समानता आणि सहभाग वाढवण्याच्या दृष्टीने महत्त्वाची ठरत आहे. या पध्दतीचा प्रयोग आता महाराष्ट्रत श्रीमती सरला शामराव कामे यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा धोत्रा येथे केला आहे हा एक शैक्षणिक पद्धतीत बदल झाला.. हा बदल खूप मोठा नसला तरी त्याचा परिणाम खूप मोठा नक्कीच असेल.. मागच्या बेंच वर बसणाऱ्यांना आपण सहसा बॅक बेंचर म्हणतो ज्यांना शैक्षणिक बाबतीत ढ समजलं जातं.. मात्र हे बॅक बेंचर जसजसा वर्ग वाढतो तसतसे शैक्षणिक बाबतीत मागेच पडत जातात म्हणून आता एक नवीन प्रयोग आलेला असून अर्ध वर्तुळाकार बेंच ही नवी पद्धत विकसित करण्यात आलेली असून कोणीही बॅक बेंचर नसेल अशी पद्धत वापरली जात आहे..केरळच्या मल्याळम भाषेतील चित्रपट '८' मधून प्रेरणा घेत, विद्यार्थ्यांना वर्गात पूर्ण किंवा अर्थ गोलाकार पद्धतीने बसवण्याची नवीन व्यवस्था लागू करण्यात आली आहे... यामुळे शिक्षक आणि विद्यार्थ्यांमधला संवाद वाढतो, आणि मागच्या बाकांवरील दुर्लक्षित विद्यार्थीही आता चर्चेत सहभागी होतात... ही अभिनव कल्पना शिक्षणातील समानता आणि सहभाग वाढवण्याच्या दृष्टीने महत्त्वाची ठरत आहे... विद्यार्थी संख्या कमी असेल तर आपल्या गावातील शाळेत शिक्षक असा प्रयोग राबवू शकतात.. सुजाण नागरिकांनी असं आवाहन करायला काय हरकत नाही...




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १६ जुलै २०२५


## 'मन चिंब पावसाळी' काव्य मैफिलीस रसिकांची उस्फुर्त दाद




**छत्रपती संभाजीनगर** : (12 जुलै)- 'ध्यास गझल साहित्य समूह', 'टेरेस वरील कविता समूह', 'शताब्दी काव्य मंडळ' आणि 'ट्रान्स डेल्टा फाऊंडेशन आयोजित 'मन चिंब पावसाळी' पाऊस,प्रेम आणि इतर कवितांची बहारदार मैफिल मृदगंध कला दालन, N ३ सिडको, छत्रपती संभाजीनगर येथे चांगलीच रंगली.पावसाच्या सरींसोबत मनातील भाव भावनांचा वेध घेणाऱ्या दर्जेदार कवितांची जुगलबंदी रसिकांनी अनुभवली.सोबतच प्रा.प्रवीण बोबडे ह्यांच्या सुमधुर स्वरात पावसाची गाणी देखील ऐकायला मिळाली.पाऊस, प्रेम ह्यांवरील कविता आणि पावसाच्या गाण्यांनी मैफिल रंगली. कवयित्री कस्तुरी कुलकर्णी ह्यांनी'अजूनही ओले पान मनाचेजरी पुराना झाला पाउस,आठवणींच्या गावी भेटतोपुन्हा नव्याने बीज पेरतो.'ही कविता सादर केली तर श्री रमेश ठोंबरे ह्यांनी'कसे साधले ना पुन्हा पावसाने,तुला गाठले ना पुन्हा पावसाने,तुझ्या गोड हास्यातूनी जाणले मीतुला छेडले ना पुन्हा पावसाने.'ही गझल सादर केली.सुप्रसिद्ध कवी, गझलकार श्री गिरीश जोशी ह्यांनी,'समजला कुठे का कुणा पावसाळाऋतुंच्या घरी पाहुणा पावसाळा'ही गझल सादर करून रसिकांची मने जिंकली.कवी ऋषभ कुलकर्णी ह्यांनी,'झळा सोसून गेलेल्या तुझ्या माझ्या वसंताला,सुखाची सर बरसणारे नवे श्रावण हवे आहे.' हे गझलेचे शेर सादर केले. कवी दीपक हापत ह्यांनी'असे काय होते तुला पाहतांनाजगाला विसरतो तुला पाहतांना'.ही गझल सादर केली.तर रूपाली पाटील ह्यांच्या'आपणच ठरवायचं की,कधी द्यायचा पूर्णविराम 'ह्या कवितेने मैफलीत रंग भरले. श्री.प्रशांत नानकर ह्यांच्या'दोन्ही बरसले तेव्हा,फरक उमगला नाही,'डोळ्यातून आले थोडे,नभातून आले काही.'ह्या ओळी दाद घेऊन गेल्या. कवयित्री सुनिता कपाळे ह्यांनी'रिमझिम बरसत्या सरीत,बेभान गंधाळते अवनी' ही कविता सादर केली.कवयित्री शमा बरडे ह्यांनी,'कशी लिहू पाना फुलांच्या' ही कविता सादर केली.प्रा विजय पोहणेरकर ह्यांनी,'समजंवावं कुठवरी काही उमगत नाही,काय झालं कुणा ठावं पाऊस येत नाही'.ही कविता सादर केली. सुप्रसिद्ध गझलकार श्री.शैलेश देशपांडे ह्यांच्या'ती चंद्रभागेसारखी स्पर्शून जाते,मी वाळवंटासारखा तल्लीन होतो.' या कवितेने मैफिल रंगवली. श्री ज्ञानेश्वर कुलकर्णी ह्यांनी अभंग रचना सादर केली. कवी प्रा. डॉ.सुशिल सातपुते ह्यांनी'बरं झालं बाप्पा तू पक्षात नाहीस,पक्षांचं चिन्ह म्हणून कोणाच्या लक्षात नाहीस.'ही कविता सादर केली.यासोबतच,कवी श्री विजयकुमार पांचाळ यांच्या 'अन्नाशिवाय तान्ही लेकरं मरतायत्यांना कृषीप्रधान देश कळू देविठ्ठला अशीच वारी तुझी माझ्या गावाकडे भरू दे..' या कवितेला रसिकांची दाद मिळाली. यासोबतच कवयित्री पुर्वा तांदूळवाडीकर, कवी विनायक दास,विनोद सिनकर,हर्षवर्धन दीक्षित,सुशिल देशमाने,अजय त्रिभुवन,श्री आर.पी. शिखरे, पंडित वराडे, अनिल बडवे इत्यादी कवींनी आपापल्या दर्जेदार कवितांनी मैफिल जिंकली. या 'मन चिंब पावसाळी' काव्य मैफिलीचे बहारदार सूत्रसंचालन सुप्रसिद्ध कवी गझलकार श्री गिरीश जोशी यांनी केले. प्रा.प्रवीण बोबडे ह्यांनी 'हिरवा निसर्ग हा भवतीने', 'मियां मल्हार रागातली चीज,' 'पाऊस दाटलेला', 'रिम झीम गिरे सावन,' 'श्रावणासारखे,' 'बेधुंद,' इत्यादी गीते गायली त्यास रसिकांची विशेष दाद मिळाली. या मैफीलीच्या यशस्वितेसाठी श्री.प्रशांत नानकर, कवी गझलकार श्री गिरीश जोशी ह्यांनी परीश्रम घेतले .BolaOk

## सुशीलादेवी देशमुख विद्यालयात विद्यार्थी संसद निवडणूक संपन्न






**छत्रपती संभाजीनगर :** येथील सुशीलादेवी देशमुख माध्यमिक विद्यालयात विद्यार्थी संसद निवडणूक घेण्यात आली. एकूण २४ विद्यार्थी प्रतिनिधी मधून पाच जनांनी अध्यक्ष आणि उपाध्यक्ष पदासाठी अर्ज भरले होते. यातून चि. प्रमेय कुलकर्णी याची अध्यक्ष म्हणून तर चि. सौरभ सरकटे याची उपाध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. मुख्याध्यापक श्री. बी.जे. पहिलवान यांनी दोघांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. यावेळी निवडणूक अधिकारी म्हणून श्री. लक्षण कुऱ्हे, श्रीमती एम. बी. मराठे व श्रीमती एम. व्ही. देसले यांनी काम पाहिले. या वेळी झालेल्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती के.बी. पाटील यांनी केले. तर श्रीमती पी. जी. तुगावे यांनी सर्वांचे आभार मानले.

## घरकुल लाभार्थ्यांच्या घरबांधणीवर २०० मीटर अंतराच्या मर्यादेमुळे पुरातत्व विभागाकडून अडथळा



**दौलताबाद (जावेद अहमद)** : दौलताबाद गावात प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत सुरू असलेल्या घरकुल लाभार्थ्यांच्या घरबांधणीवर २०० मीटर अंतराच्या मर्यादेमुळे पुरातत्व विभागाकडून अडथळा निर्माण केला जात आहे. यावर राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्यांक विभागाचे जिल्हा कार्याध्यक्ष सैय्यद लायकोद्दीन यांनी पुरातत्व विभागाच्या अधीक्षक डॉ. शिवकुमार भगत यांची भेट घेऊन निवेदन सादर केले.निवेदनात त्यांनी नमूद केले की, दौलताबाद गावात ग्रामपंचायतीच्या माध्यमातून गरीब लाभार्थ्यांना घरकुल योजना राबवली जात आहे. मात्र, पुरातत्व विभागाच्या अधिकाऱ्यांनी २०० मीटर अंतरावर बांधकाम न करण्यासंदर्भात लाभार्थ्यांना तसेच ग्रामपंचायत कार्यालयास नोटीस दिली आहे.सैय्यद लायकोद्दीन यांनी स्पष्टपणे सांगितले की, नियमांनुसार केवळ १०० मीटर परिसरातील बांधकामांवर निर्बंध असावा, परंतु २०० मीटर अंतरावर नोटीस देणे हे गरीब नागरिकांवर अन्याय आहे. "हे लाभार्थी आर्थिक दृष्ट्या दुर्बल आहेत, त्यांना मूलभूत सुविधा पुरवण्यासाठी केंद्र शासन प्रधानमंत्री आवास योजना राबवत आहे. मात्र, विभागाचे अधिकारी त्यांच्या घराच्या बांधकामात अडथळा निर्माण करत आहेत," असे ते म्हणाले.त्यांनी मागणी केली की, पुरातत्व विभागाने १०० मीटर अंतराचा सर्वे करून त्यावरच निर्णय घ्यावा. २०० मीटर किंवा त्यापेक्षा अधिक अंतरावरील घरकुल बांधकामावर कोणतीही आडकाठी आणू नये. यासोबतच, ३०० ते ४०० मीटर अंतरावर असलेल्या बांधकामांनाही नोटीस देण्यात येत असल्याचे निदर्शनास आले असून, अशा अन्यायकारक नोटिसींवरही त्वरित कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १६ जुलै २०२५


## जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत 'मुलींचे आरोग्य व सुरक्षा' या विषयावर कार्यशाळा



**छत्रपती संभाजीनगर** : धोत्रा जिल्हा परिषद प्राथमिक शाळा धोत्रा येथे विद्यार्थिनींसाठी ‘मुलींचे आरोग्य व सुरक्षा’ या अतिशय महत्त्वपूर्ण विषयावर सशक्त मार्गदर्शनपर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचे आयोजन शाळेच्या मुख्याध्यापक व शिक्षकांच्या सहकार्याने करण्यात आले. या कार्यशाळेचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून सुप्रसिद्ध समाजसेविका, महिला सक्षमीकरण कार्यकर्त्या श्रीमती सरला कामे मॅडम उपस्थित होत्या. त्यांनी आपल्या समर्पक व अनुभवसमृद्ध मार्गदर्शनातून विद्यार्थिनींना आरोग्य विषयक जागरूकता, मासिक पाळी दरम्यानच्या स्वच्छतेचे महत्त्व, योग्य आहार, वैयक्तिक स्वच्छता, मानसिक आरोग्य यांसह मुलींनी आपल्या सुरक्षिततेसाठी कोणती खबरदारी घ्यावी, आत्मविश्वास कसा वाढवावा यावर सोप्या व प्रभावी भाषेत संवाद साधला.श्रीमती सरला कामे म्हणाल्या की, "आजच्या मुलींनी स्वतःच्या आरोग्याची आणि सुरक्षिततेची जाणीव ठेवणे ही काळाची गरज आहे. आपली काळजी आपणच घेतली पाहिजे. शिक्षणासोबत आत्मरक्षा, आत्मभान आणि स्वच्छतेची शिस्त अंगी बाणवली तर कोणतीही अडचण आपल्याला रोखू शकत नाही. "कार्यशाळेदरम्यान विद्यार्थिनींनी आपले प्रश्न सरळपणे मांडले संवादात्मक पद्धतीमुळे मुलींमध्ये उत्साह निर्माण झाला आणि त्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. शाळेच्या मुख्याध्यापकांनी श्रीदेवसिंग जाधव सर यांनी अध्यक्ष स्थान भुषवले तर श्री जयंत पाताळयत्री सरांनी प्रास्ताविक केले श्रीमती रत्नप्रभा बोर्डे मॅडम यांनी आभारप्रदर्शन करताना सांगितले की, "या कार्यशाळेमुळे विद्यार्थिनींमध्ये आरोग्य आणि सुरक्षितते बाबतची जाणीव वाढली असून अशा उपक्रमांचे सातत्याने आयोजन करण्याचा आमचा मानस आहे."कार्यक्रमाला , श्री आत्माराम सोन्ने सर श्री दिनकर चव्हाण सर , श्रीमती उषा सौर , पुष्पा पाटील मॅडम उपस्थित होते या कार्यशाळेमुळे विद्यार्थिनींमध्ये आत्मभान, आत्मविश्वास आणि सुरक्षितते बाबतची सजगता निर्माण झाली असून समाजात अशा उपक्रमांची नितांत गरज आहे, असे प्रतिपादन अनेकांनी केले.


**१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा)**
**विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी**

**D.M.L.T**

**Diploma In Medical Laboratory Technology**

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

**मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.**

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903


## शिक्षणाबरोबरच युवकांनी ज्ञानकौशल्यही आत्मसात करावे - जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांचे प्रतिपादन



**जालना** : आपल्या अंगी कौशल्य असणे महत्त्वाचे आहे. शिक्षण घेत असताना याकडे अधिक लक्ष द्यावे. असे प्रतिपादन जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले.बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय कौशल्य दिवसाच्या निमित्ताने रोजगार मेळाव्याचे उद्‌घाटन करताना ते बोलत होते.यावेळी महिकोचे चेअरमन श्री. राजेंद्रजी बारवाले, जिल्हा कौशल्य विकास रोजगार आणि उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे आयुक्त श्री. भुजंग रिठे, अभिनव इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड मॅनेजमेंटचे चेअरमन श्री. सुधीर दीक्षित आणि प्राचार्य कविता प्राशर यांची उपस्थिती होती.वाढती बेरोजगारी समाजासाठी धोक्याची असते असे सांगून जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ म्हणाले की, देशाची प्रगती ही युवकांवर अवलंबून असते. म्हणून प्रामाणिकपणे आपला अभ्यासक्रम त्यांनी पूर्ण केला पाहिजे. यावेळी त्यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या अनुपस्थितीबद्दल चिंता व्यक्त केली. अनेक विद्यार्थी महाविद्यालयात येत नाही त्यामुळे परिणामकारक शिक्षण प्रक्रिया होत नाही. विद्यार्थ्यांनी प्रामाणिकपणे नियमित महाविद्यालयात उपस्थित राहून ज्ञानग्रहण करावे आणि आपली बौद्धिक क्षमता वाढवावी अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. नियमित येण्यामुळे विद्यार्थ्यांमधील कौशल्य विकसित होत राहील. विद्यार्थी शिक्षक यांच्यात संवाद राहील. अलीकडे विविध क्षेत्रात व्यावसायिक संधी खूप वाढले आहेत त्यासाठी आपल्यातील कौशल्य वृद्धिंगत करावी लागेल. विविध कंपन्यांना त्यांना आवश्यक अशा पद्धतीने बौद्धिक कौशल्य तरुण पिढीकडे उपलब्ध नाही. वैज्ञानिक क्षेत्रात कितीही बदल झाले असले तरी माणूस बदलणे गरजेचे आहे.नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर आपले कौशल्य वाढविण्यासाठी करावा. कृत्रिम बुद्धिमत्ता याचा वापर आपल्या शैक्षणिक उत्कृष्टतेसाठी केला पाहिजे. बदलत्या काळानुसार व्यावसायिक संधी सुद्धा बदलत आहेत त्या ओळखून युवकांनी आपली प्रगती करावी व त्यासाठी प्रामाणिकपणे मेहनत करणे गरजेचे आहे. ज्ञानाबरोबर त्याचे उपयोजन हे महत्त्वाचे आहे असेही त्यांनी सांगितले.श्री.राजेंद्रजी बारवाले म्हणाले की, आम्ही उद्योग जगताला मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करू. औपचारिक शिक्षणाबरोबरच व्यक्तीमधील कौशल्य विकसित झाले पाहिजे. बदलत्या काळाची आव्हाने विद्यार्थ्यांनी ओळखली पाहिजे. रोजगार भरती ही यासाठी सुवर्णसंधी असून विद्यार्थ्यांनी आपल्यातील कौशल्याचा अधिकाधिक विकास करावा. अभ्यासक्रम हा उद्योग क्षेत्राशी निगडित असावा यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत. वर्तमानात शासकीय स्तरावरही मोठ्या प्रमाणावर प्रयत्न होत असून अप्रेंटिसशिप प्रोग्रॅमसाठी प्रयत्न होत आहे. हे अत्यंत महत्त्वाचे आहे. हा जॉब फेअर आयोजित करण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न केले आणि त्याला उत्स्फूर्त असा प्रतिसाद दिला त्याबद्दल आपल्या सर्वांना शुभेच्छा देतो असे ते म्हणाले.यावेळी अमेझॉन, गोदरेज ॲग्रो वेट, उर्मिला, एन आय आय टी, युबीएल, फ्लिपकार्ट, बजाज, सीआयआय, ॲक्सिस बँक, एचडीएफसी बँक, इ.ओ.एस. ग्लोब, ब्लू स्टार, एअरटेल, वरद एंटरप्राइज, जुबिलन्ट फुडवर्क, मॅन पॉवर, ग्रो इंडिगो, केअर हेल्थ इन्शुरन्स, स्पेक्ट्रम, मॅजिक कन्सल्टिंग सर्विसेस, किसान कनेक्ट, मेराकी यासह अनेक कंपन्यांचा सहभाग होता.या मेगा भरतीचे महत्त्वाचे वैशिष्ट्ये म्हणजे सुरळीत समन्वय आणि पद्धतशीर नोंदणी प्रक्रिया होय. यामध्ये विविध क्षेत्रातील कंपन्यांचा व्यापक सहभाग होता. त्याचबरोबर जागेवरच निवड आणि मुलाखतीच्या फेऱ्या झाल्या. नियोक्ते आणि नोकरी शोधणाऱ्यांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला. त्याचबरोबर महाविद्यालयीन कर्मचारी आणि स्वयंसेवकांकडून उत्तम पाठिंबा मिळाला. आजचा हा आयोजित केलेला रोजगार मेळावा रोजगार शोधू पाहणाऱ्या पर्यंत पोहोचला त्यांचा उत्साहवर्धक सहभाग आणि रोजगार परिणामांच्या बाबतीत तो खूप यशस्वी ठरला. या कार्यक्रमाने कंपन्या आणि संभाव्य उमेदवारांमधील अंतर कमी करून सकारात्मक प्रभाव निर्माण केला, त्यांना त्यांच्या करिअरच्या प्रवासात पुढे जाण्यास मदत केली.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करून आभार प्रा. सुधीर देशपांडे यांनी मानले.यावेळी डॉ.भूषण नाफडे, डॉ.रवींद्र भोरे, प्रा.संदीप पाटील, डॉ. निलेश बर्डे, डॉ. रामेश्वर म्हस्के, प्रा गायत्री कोंबे.यांच्यासह शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १६ जुलै २०२५


# शेती आणि संस्थेप्रती समर्पित व्यक्तिमत्व ; मा. अशोकराव आहेर अण्णा



दि. 14 जुलै, 2025 रोजी मा. अशोकराव आबाराव आहेर यांचे दुःखद निधन झाले... त्यांच्याआठवणीना उजाळा देणारा लेख.शिवनानदीच्या तीरावर असणाऱ्या टाकळी (लव्हाळी) या छोट्याश्या गावीएका सदन शेतकरी कुटुंबात मा. अशोकराव आबारावजी आहेर उर्फ आहेर अण्णायांचा जन्म दि. 20 नोव्हेंबर, 1951 रोजी झाला. बालपणापासून त्यांना शेतीचीआवड होती. कुटुंबातील शेती, माती आणि नाती यांचे संस्कार अण्णांनी आयुष्यभरजपले. काळानुरूप शेतीमध्ये नवनवीन प्रयोग केले. शेतीतीत पाईपलाईन करूनसिंचनाची सोय केली. शेतीमध्ये पारंपारीक पिकाशिवाय संत्रा, डाळिंब, ऊस आणिबांबू आदी पिकांची लागवड केली. कन्नड तालुका आणि छत्रपती संभाजीनगरजिल्ह्यातील प्रयोगशील शेतकरी, कृषी अधिकारी, बँक अधिकारी, पंचायतसमितीतील अधिकारी तसेच प्रशासकीय अधिकारी यांच्याशी त्यांचे स्नेहाचे आणिआपुलकीचे संबंध होते. जुन्या काळातील त्यांचा ऐतिहासिक आणि समृद्ध वाडापंचक्रोशीतील लोकांच्या आकर्षण व चर्चेचा विषय आहे. या वाड्यावर वा घरीअण्णा शेतकरी आणि अधिकारी यांना आवर्जून बोलवत व जेवण देत.वाड्यावर आलेला कोणताही माणूस बिगर चहा किंवा जेवणाचा जात नाही. याकाळातही माणसातलं माणूसपण त्यांनी जपलं आणि जोपासलं आहे. अण्णांचीभेट झाली की ते शेती, शेतकऱ्यांचे प्रश्न आणि शेतीतील नवीन प्रयोग यावरभरभरून बोलत, माहिती देत. शेती संदर्भात नवीन व्हिडिओ आला तर ते शेतीचीआवड असणार्यांना आवर्जून शेअर करत,पाठवत. शासन - प्रशासन स्तरावर शेतीआणि शेतकऱ्यांचे होणारे शोषण आणि विरोधी धोरण यावर ते टीका करत.शेतकऱ्यांनी आपल्या हक्क आणि अधिकारासाठी संघटित झाले पाहिजे, यासाठीते आग्रही असत.कन्नड तालुक्यातील शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी संस्थेच्यावतीने महाविद्यालयात प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या शनिवारी "कृषी मंच" /"ऍग्रो फोरम" मार्फत महाराष्ट्रातील तज्ञ, अनुभवी आणि प्रयोगशील व्यक्तींचेमार्गदर्शन ठेवण्यात येत असे. या मार्गदर्शनास अण्णा दिवसभर आवर्जूनउपस्थित रहात. शेती संबंधी अभ्यासकांशी चर्चा करत.महाराष्ट्रातील नामांकित श्री. छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारकमंडळाच्या अनेक पदावरील जबाबदारी अण्णांनी यशस्वीरीत्या पार पाडल्या.यामध्ये संस्थेचे संचालक, डॉ. भीमराव आंबेडकर कनिष्ठ महाविद्यालयचे अध्यक्ष,संस्थेचे उपाध्यक्ष आणि सचिव आदी भूमिका, पद व जबाबदाऱ्या त्यांनी अत्यंतसचोटी आणि प्रामाणिकपणे बजावल्या. संस्थेचे अध्यक्ष आदरणीयश्री.मानसिंहजी पवार उर्फ बापूसाहेब यांचे ते विश्वासू व एकनिष्ठ सहकारी होते.स्वतःच्या प्रकृतीची काळजी न करता वयाच्या ७४ व्या वर्षी अण्णा स्वतःचा डबाघरून घेऊन येत, सकाळी दहा वाजता महाविद्यालयात हजर असत, ते चारवाजेपर्यंत न थकता थांबत. संस्थेचा वा महाविद्यालयाच्या कोणताही कार्यक्रमअसो तो कार्यक्रम होईपर्यंत उपस्थित राहत. रात्र झाली तरी कोणतीही घाई वगडबड ते करत नसत. अण्णा कार्यक्रमात काहीही बोलत नसले तरीही तोकार्यक्रम एकाग्रपणे ऐकत. कार्यक्रमाविषयीच्या प्रतिक्रिया देत. स्वतःचे प्रकृतीचीकाळजी वा कोणतीही चिंता ते कधीही करतांना दिसले नाहीत. वयाच्या ७४ व्यावर्षातही तरुणांना लाजवेल अशा उत्सोव त्यांच्या मध्ये दिसत असे. अशापरिस्थितीतही संस्थेसाठी कार्य त्यांनी केले. खरोखरच संस्थेप्रती एवढे 'डेडिकेट'(समर्पित) व्यक्तिमत्व मी तरी आजपर्यंत पाहिले नाही.अण्णा आजारी असतानाही महाविद्यालयात येत, प्राध्यापक वप्राध्यापकेत्तर कर्मचाऱ्यांच्या सुख-दुःखात सहभागी होत, एखादया कर्मचारी-प्राध्यापकांची कोठे निवड व नेमणूक झाली वा पुरस्कार मिळाला तर त्यालाभेटून, फोन करून, फेसबुक वा व्हाट्सअपच्या माध्येमातून शुभेच्छा देत.अभिनंदन करत. अभिमान बाळगत. त्यामुळे आम्हा सर्व कर्मचाऱ्यांमध्येअण्णांविषयी आपलेपणाची व आपुलकीची भावना आहे.अण्णांचे राहणीमान साधे होते, पांढरे शुभ्र खमिस आणि पॅन्ट,पायात सँडल. त्यांचा स्वभाव, साधा, सरळ, स्पष्ट, परखड आणि अनौपचारिकहोता. नवीन वा अनोळखी माणसाशी ते अगदी सहज आणि मनमोकळेपणानेसंवाद साधत. त्यांना बोलण्याची खुप आवड होती, माणूस वयाने लहान किंवामोठा असो, त्याच्याशी ते सहज आणि मनमोकळेपणाने संवाद साधत. सर्व गोष्टीशेअर करत. अण्णा न आवडणाऱ्या वा पटणाऱ्या गोष्टी तोंडावर आणि बेधडकबोलत, परंतु कधीही कोणाविषयी मनात द्वेष वा मत्सर ठेवत नसत. 'पोटाततेच ओठात 'असे, ते आयुष्यात कधीच कृत्रिम जगले व वागले नाहीत. हे त्यांच्याव्यक्तिमत्वाचे वैशिष्टये होते, खास ओळख होती. त्यांमुळे त्यांचा पंचक्रोशीमध्येआदर व दरारा होता. त्यांनी आपल्या आयुष्यात कोणाचेही आर्थिक नुकसानकेले, हे ऐकण्यात नाही. महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांमध्ये शिस्त असावी,यासाठी ते आग्रही असत. कर्मचाऱ्यांना योग्य ठिकाणी बेधडक बोलत आणिविसरून जात. त्यांचे लोकांना भेटण्याचे केंद्र म्हणजे गल्लेबोरगाव हे होते. अण्णात्या ठिकाणी सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आणि धार्मिक क्षेत्रातील विविधमान्यवरांना भेटत, चर्चा करत. प्रस्थापित राजकारणावर ते प्रखरपणे बोलत परंतुकोणत्याही राजकीय प्रक्रियेमध्ये त्यांनी सहभाग घेतला किंवा निवडणुकीत उभाराहिले, याची माहिती मला तरी नाही. राजकारणापेक्षा त्यांना शिक्षण,समाजकारण आणि शेतीची विशेषची विशेष आवड होती. त्यांच्यावर काँग्रेसपक्षाचा आणि महानुभव संप्रदायाचा विशेष प्रभाव होता. महानुभव संप्रदायाचे तेउपासक व प्रचारक होते, टाकळी या आपल्या गावी महानुभव सांप्रदायाच्यामंदिर उभारणीत त्यांचा मोलाचा वाटा राहिला आहे.अण्णांची आणि आम्हा सहकाऱ्यांची भेट झाली की, आरोग्याबाबतनेहमी चर्चा करत, आरोग्य बाबत दक्ष असत. मधुमेहावर काळे गहू कसे चांगलेयाची माहिती प्राध्यापक सहकार्यांना देत, शेतामध्ये काळ्या गव्हाची पेरणी करूनकाळे गहू आले की, प्राध्यापक सहकार्यांना आवर्जून सांगत आणि गहूस्वतःच्या गाडीत घेऊन येत, त्यांना देत. त्यामागे आपुलकी आणि कळजी आसे.मी २००४ मध्ये संस्थेत रुजू (जॉईन) झालो, त्यावेळी अण्णा डॉ .भीमराव आंबेडकर कनिष्ठ महाविद्यालयाचे अध्यक्ष होते, त्यांच्या सहीने मलाऑर्डर मिळाली. माझे गुरु प्रा. भगवान खवणे सर हे अण्णांचे नातेवाईक.अण्णांनी सरांकडून माझी परिस्थिती, पार्श्वभूमी आणि माहिती काढली होती.माझे गुरु प्रा. खवणे सरांजवळ अण्णा म्हणाले होते, "तुम्ही आमच्यामहाविद्यालयाला एक चांगला प्राध्यापक दिला." प्रा. खवणे सरांची जेव्हा -जेव्हा भेट होते, तेव्हा सर आवर्जून सांगतात. अण्णांची आणि माझी जेव्हाकेव्हा भेट होत असे. तेव्हा ते म्हणत, "काय चाललय खेत्री ?" म्हणून आवर्जूनआणि आस्तेने बोलत. मला सातत्याने प्रेरणा आणि प्रोत्साहन देत.अण्णा आणि प्राचार्य डॉ. विजय भोसले सर एकमेकांशी अगदीमनमोकळेपणाने बोलत, चर्चा करत. प्राचार्य भोसले सर आम्हाला बोलताना नेहमीम्हणतात, 'आपण महाविद्यालयात पगारासाठी काम करतो व जातो, पण अण्णापगारासाठी नव्हे तर तालुक्यासाठी काम करतात. आपल्या सोबत आपल्याइतकाच वेळ देतात. अण्णा कोणताही वेळ - काळ न पाहता संस्थेच्याविकासासाठी व भल्यासाठी २४ तास उपलब्ध असतात. आपल्या संस्थेच्याविकासासाठी लोकनेते मा.बाळासाहेब पवार साहेब, मा.आप्पासाहेब नागदकर,मा.काकासाहेब औराळकर, मा. लक्ष्मणराव मोहिते अण्णा आणि मा.रामराव पाटीलबहिरगांवकर अण्णा यांच्या सोबत काम करणारे आहेर अण्णा हे शेवटचेप्रतिनिधी आहेत. माझ्यावर आणि संस्थेतील सर्व कर्मचाऱ्यांवर विश्वास ठेवूनकोणतेही कागद न वाचता पुढील व्यक्तीवर विश्वास ठेवून ते सही करतात.'संस्थेसाठी सर्वाधिक वेळ देणारे अण्णा संस्थेप्रती समर्पित व्यक्तिमत्व होते.तेव्हा अण्णांचे कार्य, कर्तुत्व, योगदान आणि व्यक्तिमत्व कायम आमच्यास्मरणात राहतील.अण्णा, आज शरीरानं आपल्यात नाहीत, पण त्यांच्या विचार, माणुसकी आणिआठवणी आपल्या सोबत कायम राहतील. अण्णांना भावपूर्ण श्रद्धांजली...!


**डॉ. प्रकाश जनार्धनराव खेत्री**

समाजशास्त्र विभाग

डॉ. भिमराव आंबेडकर महाविद्यालय,

कन्नड, जि. छ. संभाजीनगर



**बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002**

**महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.**

**कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.**

**संपर्क क्र. 7588005002**